10 SEP 2017 Times of India

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Underground pipelines to stop Rankala from getting polluted: KMC

TIMES NEWS NETWORK

TOI



The civic body had claimed that it has diverted all sewage water and stopped its release into the lake

**Kolhapur:** An underground drainage line needs to be set up in the residential areas along Rankala lake, to avoid sewage seeping into the lake waters, according to the environment cell of the city civic body.

The recommendation comes after a report from Shivaji University, Kolhapur (SUK) confirmed that presence of sewage has led to the growth of algae in the lake.

The KMC had claimed that it diverted all sewage water and stopped its release into the lake.

When algae was found growing in the lake, water samples were sent for testing to the university laboratory. The report found that concentrations of sulphates and nitrates have increased mainly due to sewage seeping into the lake.

Samir Vyaghrambare, chief environmental officer of KMC said, "The surface run off of storm water drains during the rains has resulted in the growth of algae in the lake. We have surveyed the area and found that during heavy rain the drains cannot withstand the increase in the quantity of waste water. The water then seeps into the lake. We have decided to lay down new underground drainage lines so that less sewage is carried through the open drains. Hence, avoiding any such incident during the rains."

The nitrate concentration of the lake water has increased from 16 mg/litre to 26 mg/litre as per the report. The sewage will continue to seep into the lake during heavy rains.

The report claims that biological oxygen demand (BOD) has not altered significantly as sewage water gets diluted during heavy rains. According to KMC's drainage department just 20% of households in the area near the lake have connected their drainage outlets to the underground drainage network. The rest release their sewage into the open, which then flows to the 'nullahs' and open storm water drains.

"We are going to appeal to residents to get their drainage outlets linked with underground pipes. For effective treatment of waste water, the waste water needs to be carried through pipes. Sewage was stopped from entering the lake in 2015. Since then, the water quality of the lake has improved," said Vyaghrambare.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 SEP 2017
Times of Indi

# District level college youth fest to start next week

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** District level youth festival of colleges affiliated to Shivaji University, Kolhapur (SUK) will start in Satara district from Thursday, September 14 at the Phaltan based Mudhoji College.

SUK student welfare officer R B Gurav told **TOI** that students from over 200 colleges across Sangli, Satara and Kolhapur districts will be part of the youth festival that encourages extra-curricular activities among students. The event will be conducted in as many as 26 different categories.

Events such as folk dance, classical singing, classical dance, one act play, street play, debates, group singing, folk orchestra among others will be organised. All the events will be held in individual as well as group categories.

**Over 2,000 students were part of the youth festival. The university expects much better response this year**

According to officials last year over 2,000 students were part of the youth festival. The university expects much better response this year.

Gurav said, "The festival will kick off from September 14 for Satara district at Mudhoji College in Phaltan. On September 16 the Arts, Commerce and Science College, Palus will host the youth festival for Sangli district. On September 18, R B Madkholkar College in Chandgad will host the festival for Kolhapur district."

After completing the district level rounds winners will advance to the central youth festival scheduled at Karmaveer Hire Arts, Commerce and Science College in Gargoti from September 25.

According to the official winners from the central youth festival will get a chance to represent Shivaji University at the inter-university youth festival 'Indradhanush' in November.

A team of 40 students, winners from the preceding rounds, will represent SUK in the inter-university festival at Parbhani in the first week of November, Gurav added.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 SEP 2017

पुढारी

# पत्रकारांसाठी विद्यापीठात गुरुवारी कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभाग तसेच एम.ए. मास कम्युनिकेशन विभागाच्या वतीने जिल्ह्यातील पत्रकारांसाठी गुरुवारी (दि. १४) एकदिवशीय कार्यशाळा आयोजित केली आहे. 'युनिसेफ' च्या वतीने ही कार्यशाळा विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात सकाळी १० ते सायंकाळी ४ पर्यंत घेण्यात येणार आहे.

बालमृत्यू दर रोखणे, वॉश, विकास पत्रकारिता आदी या कार्यशाळेच्या मध्यवर्ती संकल्पना आहेत. या विषयावर राज्यातील तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. ही कार्यशाळा शहरी व ग्रामीण पत्रकारांसाठी आहे. सहभागी पत्रकारांना कार्यशाळा किट आणि प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

बालमृत्यू दर रोखणे, स्वच्छता आणि आरोग्य यासंदर्भात माध्यमे सकारात्मक बदल घडवू शकतात. म्हणूनच युनिसेफने विकासाच्या संकल्पनेत माध्यमांचा पर्यायाने पत्रकारांचा समावेश केला आहे. या कार्यशाळेत पत्रकारांना विकास पत्रकारितेविषयी माहिती देण्यात येणार आहे. या कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी पत्रकारांनी वृतपत्रविद्या व संवादशास्त्र विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन विभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 SEP 2017
महाराष्ट्र टाईम्स

## विद्यापीठात पत्रकारांसाठी गुरुवारी कार्यशाळा

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या आणि संवादशास्त्र विभाग, एम. ए. मास कम्युनिकेशन विभागातर्फे जिल्ह्यातील पत्रकारांसाठी गुरुवारी (ता. १४) कार्यशाळा आयोजित केली आहे. युनिसेफतर्फे ही कार्यशाळा विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात सकाळी दहा ते चार या वेळेत होईल. कार्यशाळेत बालमृत्यू दर रोखणे, विकास पत्रकारिता, आदी विषयांवर मार्गदर्शन केले जाणार आहे. शहरी आणि ग्रामीण पत्रकारांसाठी कार्यशाळा होईल. माध्यमे बालमृत्यू दर, स्वच्छता, आरोग्य आदींसंदर्भात सकारात्मक बदल घडवू शकतात. पत्रकारांनी वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन विभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 SEP 2017
पुण्यनगरी

# विद्यापीठात १४ रोजी पत्रकारांसाठी कार्यशाळा

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभाग तसेच एम.ए. मास कम्युनिकेशन विभागाच्या वतीने जिल्ह्यातील पत्रकारांसाठी १४ सप्टेंबर रोजी एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. युनिसेफच्या वतीने ही कार्यशाळा विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात सकाळी दहा ते दुपारी चार या वेळेत घेण्यात येणार आहे.

बालमृत्यू दर रोखणे, वॉश, विकास पत्रकारिता आदी या कार्यशाळेच्या मध्यवर्ती संकल्पना आहेत. या विषयावर राज्यातील तज्ज्ञ मंडळी पत्रकारांना मार्गदर्शन करणार आहेत. ही कार्यशाळा शहरी व ग्रामीण पत्रकारांसाठी आहे. कार्यशाळेत सहभागी होणाऱ्या पत्रकारांना कार्यशाळा किट आणि प्रंमाणपत्र देण्यात येणार आहे. सहभागी होणाऱ्या पत्रकारांनी वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन विभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 SEP 2017
तरुण भारत

# पत्रकारांसाठी विद्यापीठात १४ रोजी कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभाग तसेच एम. ए. मास कम्युनिकेशन विभागाच्यावतीने कोल्हापूर जिल्ह्यातील पत्रकारांसाठी दि. १४ सप्टेंबर रोजी एक दिवसीय कार्यशाळा आयोजित केली आहे. युनिसेफच्यावतीने ही कार्यशाळा विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात सकाळी १० ते सायंकाळी ४ पर्यंत घेण्यात येणार आहे. बालमृत्यू दर रोखणे, वॉश, विकास पत्रकारिता आदी या कार्यशाळेच्या मध्यवर्ती संकल्पना आहेत. ही कार्यशाळा शहरी आणि ग्रामीण पत्रकारांसाठी आहे. कार्यशाळेत सहभागी होणाऱ्या पत्रकारांना कार्यशाळा किट आणि प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. समाजाच्या विकासामध्ये माध्यमांची भूमिका विशेष महत्त्वाची असते. विशेषतः बालमृत्यू दर रोखणे तसेच स्वच्छता आणि आरोग्य आदीसंदर्भात माध्यमे सकारात्मक बदल घडवून आणू शकतात. या पार्श्वभूमीवर युनिसेफने विकासाच्या संकल्पनेत माध्यमांचा पर्यायाने पत्रकारांचा समावेश केला आहे. एकदिवशीय कार्यशाळेत पत्रकारांना विकास पत्रकारितेविषयी माहिती देण्यात येणार आहे.

10 SEP 2017 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पत्रकारांसाठी विद्यापीठात गुरुवारी कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाचा वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभाग तसेच एम. ए. (मास कम्युनिकेशन) विभागाच्या वतीने कोल्हापूर जिल्ह्यातील पत्रकारांसाठी गुरुवारी (दि. १४) एकदिवसीय कार्यशाळा आयोजित केली आहे. 'युनिसेफ'च्या वतीने ही कार्यशाळा विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात सकाळी १० ते दुपारी चार वाजेपर्यंत घेण्यात येणार आहे.

बालमृत्यूचा दर रोखणे, वॉश, विकास पत्रकारिता, आदी या कार्यशाळेच्या मध्यवर्ती संकल्पना आहेत. या विषयांवर राज्यातील तज्ज्ञ व्यक्ती पत्रकारांना मार्गदर्शन करणार आहेत. ही कार्यशाळा शहरी आणि ग्रामीण पत्रकारांसाठी आहे. यात सहभागी पत्रकारांना कार्यशाळेचे किट आणि प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. समाजविकासामध्ये माध्यमांची भूमिका विशेष महत्त्वाची असते. विशेषत: बालमृत्यूचा दर रोखणे तसेच स्वच्छता आणि आरोग्य, आदींसंदर्भात माध्यमे सकारात्मक बदल घडवून आणू शकतात. या पार्श्वभूमीवर 'युनिसेफ'ने विकासाच्या संकल्पनेत माध्यमांचा, पर्यायाने पत्रकारांचा समावेश केला आहे. या कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी पत्रकारांनी वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन विभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार यांनी केले आहे.

10 SEP 2017 लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रतिसरकारमुळे नागरिक समाधानी

## अरुण भोसले : शिवाजी विद्यापीठामध्ये कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : सर्वसामान्य ग्रामीण नागरिकांवरील अन्यायाविरुद्ध आवाज बुलंद करण्याचे कार्य प्रतिसरकारने केले. प्रतिसरकारच्या कार्यामधून समाधानाची भावना निर्माण झाली, असे प्रतिपादन प्रा. डॉ. अरुण भोसले यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील गांधी अभ्यास केंद्र, कुंडलच्या जी. डी. बापू लाड प्रतिष्ठानतर्फे आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी क्रांती उद्योग आणि शिक्षण समूहाचे प्रमुख अरुणअण्णा लाड, तर कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर प्रमुख उपस्थित होते. विद्यापीठातील मानव्यशास्त्र इमारतीच्या सभागृहामधील या कार्यशाळेचा विषय 'जी. डी. बापू लाड आत्मकथन : एक संघर्षयात्रा' असा होता.

डॉ. भोसले म्हणाले, कर्जमुक्त करणे, अन्याय, अत्याचार आणि भय नाहीसे करणे म्हणजे स्वातंत्र्य ही जी. डी. बापूंची भूमिका सामान्य माणसाला भावली होती. सातान्याचे प्रतिसरकार हा एक गौरवशाली अध्याय होता. याचे सूत्रसंचालक जी. डी. बापू होते. प्रतिसरकारच्या कार्यामधून समाधानाची भावना निर्माण झाली. जी. डी. बापू यांना क्रांतिसिंह नाना पाटील यांचे मानसपुत्र म्हणता येईल. दोघांच्याही विचारांची नाळ घट्ट होती. बहुसंख्य खेडेगावांमध्ये ऐक्य प्रस्थापित करण्याचे काम बापूंनी केले.

कुलसचिव डॉ. नांदवडेकर म्हणाले, जी. डी. बापू लाड जसे परखड होते, तसे प्रांजळही होते. त्यांचे कार्य हे तरुण पिढीला प्रेरणादायी आहे. या कार्यक्रमात ज्येष्ठ राजकीय विश्लेषक डॉ. अशोक चौसाळकर, प्रसाद कुलकर्णी यांनी मनोगत व्यक्त केले. अधिष्ठाता डॉ. भारती पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रा. केशव हरेल यांनी आभार मानले.

### कार्य फार मोलाचे

सन १९४२ ची 'छोडो भारत' ही चळवळ इस्लामपूर, तासगाव या ठिकाणी मोठ्या प्रमाणात झाली. या काळात जी. डी. बापूंनी स्वातंत्र्यलढ्यासाठी तुफान सैनिकांची शाळा उभी केली. सर्वसामान्यांना त्रास देणाऱ्या समाजकंटकांना धडा शिकविण्याचे कार्य बापू आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केले. समाज, शेतकरी, उद्योग-व्यवसायांसाठी त्यांनी केलेले कार्य फार मोलाचे असल्याचे क्रांती उद्योग आणि शिक्षण समूहाचे प्रमुख लाड यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 SEP 2011
पुण्यनगरी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र अधिविभागामध्ये आयोजित व्याख्यानात बोलताना डॉ. एस. गुरसामी. सोबत इतर मान्यवर.

# वंचित समूहांचा अभ्यास करणे गरजेचे

## डॉ. एस. गुरसामी

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** वंचित समूहांचा सर्वंकष अभ्यास करणे हे समाजशास्त्राच्या अभ्यासकाचे ध्येय असले पाहिजे, असे प्रतिपादन तमिळनाडू येथील गांधीग्राम ग्रामीण विद्यापीठाचे प्रा. डॉ. एस. गुरसामी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र अधिविभागामध्ये यूजीसी सॅप- फेज थ्री अंतर्गत विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख वक्ते म्हणून डॉ. एस. गुरसामी बोलत होते. समाजशास्त्र अधिविभागाचे प्रमुख व सॅपचे समन्वयक प्रा. डॉ. जगन कराडे अध्यक्षस्थानी होते. गुरसामी म्हणाले, भारतीय समाजव्यवस्थेला जाती व्यवस्थेबरोबर वर्ग व्यवस्थेनेसुद्धा ग्रासलेले आहे. भारतीय समाजाची मानसिकता हा वंचित समूहांच्या सशक्तीकरणातील सर्वात मोठा अडथळा आहे. या अडथळ्यांवर मात करण्यासाठी सर्वसमावेशक धोरणाची तरतूद भारतीय राज्यघटनेमध्ये केलेली असली, तरी अपेक्षित ध्येय अद्याप गाठलेले नाही. आता वंचितांची प्रगती करणे ही सर्व शिक्षितांची व शासनाची जबाबदारी आहे, असे मतही त्यांनी व्यक्त केले. डॉ. जगन कराडे म्हणाले, भारतातील एकूणच वंचित समूहांची स्थिती सर्व राज्यांमध्ये जवळपास सारखीच असल्याचे दिसून येते. म्हणून वंचित समूहांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी शासकीय धोरणांची अंमलबजावणी काटेकोरपणे होणे अत्यंत गरजेचे आहे. सॅपच्या उपसमन्वयक डॉ. प्रतिमा पवार यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. प्रतिभा देसाई यांनी आभार मानले. प्रा. डॉ. आर. बी. पाटील, संशोधक विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 SEP 2017

सकाळ



कोल्हापूर : डॉ. नमिता खोत दीपप्रज्वलन करताना. शेजारी प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, डॉ. इनामदार आदी.

## ग्रंथालये ज्ञानमाहितीची समृद्ध दालने : डॉ. नमिता खोत

कोल्हापूर, ता. ९ : "जसे जग नवतंत्रज्ञानाने पुढे सरकत आहे, तसे आजचे शिक्षण आणि ग्रंथालयांचे स्वरूपही बदलत आहे. ग्रंथालयात केवळ पुस्तके भरलेली नसतात; तर ज्ञानस्रोत, माहिती पुरविणारी संसाधने असतात. पुस्तके माणसाचे जग बदलतात. ग्रंथालये ही ज्ञानसंप्रेषणाची समृद्ध दालने आहेत," असे शिवाजी विद्यापीठातील ज्ञानस्रोत माहिती केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत यांनी सांगितले. शिवाजी विद्यापीठ अग्रणी महाविद्यालय योजनेंतर्गत विवेकानंद महाविद्यालयातील ग्रंथालय विभागातर्फे कार्यशाळा झाली. डॉ. खोत म्हणाल्या, "ग्रंथालयांनी चांगली, दर्जेदार पुस्तके, संशोधन माहिती विद्यार्थी, वाचकांपर्यंत पोचविली पाहिजेत. इंटरनेटच्या माध्यमातून विद्यार्थ्यांला कोणतीही माहिती गोळा करता येते; पण ग्रंथालयात जाऊन ज्ञानसंपादन करणे आवश्यक असते. पुस्तके माणसाचे जीवन घडवितात." प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी बदलत्या ग्रंथालयांचे स्वरूप, व्याप्ती यावर मार्गदर्शन केले. डॉ. एस. एन. इनामदार यांनी ग्रंथालयातील माहितीची संसाधने यावर विवेचन केले. दूधसागर महाविद्यालय बिद्रीचे ग्रंथपाल प्रा. ए. आर. नगरकर यांनी ग्रंथालयासाठी माहिती संप्रेषणाचा वापर कसा करावा, याबाबत सांगितले. ग्रंथपाल डॉ. नीता पाटील यांनी स्वागत केले. डॉ. एस. व्ही. मालगावकर यांचे सहकार्य लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 SEP 2017
पुण्यनगरी



कोल्हापूर : दीपप्रज्वलन करताना डॉ. नमिता खोत. सोबत प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, डॉ. इनामदार, प्रा. एस. बी. मोरे, हितेंद्र साळुंखे.

# ग्रंथालये ज्ञानमाहितीची समृद्ध दालने

## - डॉ. नमिता खोत

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

जसे जग नवतंत्रज्ञानाने पुढे सरकत आहे, तसे आजचे शिक्षण आणि ग्रंथालयांचे स्वरूपही बदलत आहे. ग्रंथालयात केवळ पुस्तके भरलेली नसतात, तर ज्ञानस्रोत आणि माहिती पुरवणारी संसाधने असतात. पुस्तके माणसाचे जग बदलतात. ग्रंथालये ही ज्ञानसंप्रेषणाची समृद्ध दालने आहेत, असे विचार शिवाजी विद्यापीठातील ग्रंथपाल डॉ. नमिता खोत यांनी मांडले. विवेकानंद ग्रंथालय विभागाच्या वतीने शिवाजी विद्यापीठ अग्रणी महाविद्यालय योजनेंतर्गत आयोजित कार्यशाळेत त्या बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर होते.

माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचा ग्रंथालयात वापर या विषयावर बोलताना त्या म्हणाल्या, ग्रंथालयांनी चांगली दर्जेदार पुस्तके व संशोधन माहिती विद्यार्थी, वाचकांपर्यंत पोहोचवली पाहिजे. इंटरनेटपेक्षा ग्रंथालयात जाऊन ज्ञान संपादन करणे आवश्यक असते. पुस्तके माणसाचे जीवन घडवतात. त्यामुळे बदलत्या जगातील ज्ञान विद्यार्थ्यांनी अवगत केले पाहिजे. प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी, आजच्या बदलत्या ग्रंथालयाचे स्वरूप व व्याप्ती यावर मार्गदर्शन केले. शिक्षण ही अखंड चालणारी व समाजपरिवर्तन घडवणारी ज्ञानप्रक्रिया आहे. ग्रंथालये या ज्ञानयंत्रणेचा पाया आहे, असे ते म्हणाले.

वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाचे माजी ग्रंथपाल डॉ. एस. एन. इनामदार यांनी ग्रंथालयातील माहितीची संसाधने यावर विवेचन केले. दूधसागर महाविद्यालय, बिद्रीचे ग्रंथपाल प्रा. ए. आर. नगरकर यांनी ग्रंथालयासाठी माहिती संप्रेषणाचा वापर कसा करावा, याविषयी माहिती दिली. प्रारंभी स्वामी विवेकानंद, डॉ. बापूजी साळुंखे व सुशीलादेवी साळुंखे यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. प्रास्ताविक, स्वागत व पाहुण्यांची ओळख ग्रंथपाल डॉ. नीता पाटील यांनी केली. समन्वयक डॉ. एस. व्ही. मालगावकर यांचे सहकार्य लाभले. सूत्रसंचालन सुषमा इंगळे, सिमरन घुडूभाई या विद्यार्थिनींनी केले. सहायक ग्रंथपाल हितेंद्र साळुंखे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 SEP 2017

महाराष्ट्र टाईम्स

# 'ग्रंथालये माहिती पुरवणारी संसाधने'

**कोल्हापूर :** 'ग्रंथालयात केवळ पुस्तकांचे संकलन नसते तर ज्ञानस्रोत आणि माहिती पुरवणारी संसाधने असतात. पुस्तकांमुळे माणसाच्या विचारांत बदल घडतो. ग्रंथालये ही ज्ञानमाहितीची समृद्ध दालने आहेत,' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या ग्रंथपाल डॉ. नमिता खोत यांनी केले.

विवेकानंद कॉलेजमधील ग्रंथालय विभागाच्यावतीने अग्रणी महाविद्यालय योजनेअंतर्गत आयोजित कार्यशाळेत त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर होते.यावेळी ग्रंथपाल डॉ. एस. एन. इनामदार यांनी ग्रंथालयातील माहितीची साधने याविषयी माहिती दिली. ग्रंथपाल ए. आर. नगरकर यांनी माहितीच्या साधनांचा वापर कसा करावा याविषयी माहिती दिली. ग्रंथपाल नीता पाटील यांनी प्रास्ताविक केले.